*आर.सी.सी. क्र. ४३६/२०२२*
*नि.क्र. ५२/ सी*
*सरकार वि. परशूराम*

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.५ ची साक्ष</u>**

**<u>देवाशपथ खरे सांगतो की,</u>**

नाव– प्रविण श्रीराम चितळे

वय–४२ वर्षे, धंदा– पोलीस हवालदार बक्कल नं ३८५

रा. – पोलीस मुख्यालय, ता.जि. छ.संभाजीनगर

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री. व्ही.व्ही.राठोड यांचेतर्फे–</u>**

दि. ०२/१०/२०२१ रोजी मी बिडकीन पोलीस स्टेशन येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी ठाणे अंमलदार म्हणुन गुणावत कार्यरत होते. गुन्हा क्रमांक ३४४/२०२१ ची त्यांनी नोंद केला व त्याची केस डायरी तपासाकरीता मला मिळाली होती. त्यावेळी माझ्याकडे तक्रारदार यांची तक्रार, छापील प्रथम खबरी अहवाल व वैद्यकीय प्रमाणपत्र देण्यात आले होते. त्यानंतर मी त्याचे अवलोकन केले व दुसऱ्या दिवशी घटनास्थळावर गेलो होतो. घटनास्थळ हे मेहेरबान नाईक तांडा येथे होते. तक्रारदार याने मला घटनास्थळ दाखवले होते. त्याठिकाणी मला एक लोखंडी गज आढळुन आला होता. त्यानंतर मी त्याठिकाणी तो गज दोन पंचासमक्ष सविस्तर घटनास्थळ पंचनामा तयार केला होता व ते गज जप्त केला होता. त्यावेळी पंच शेख रशीद शेख हसन व संतोष अशोक अवचरमल हे होते. आता मला तो पंचनामा दाखविला तो तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचाच्या सह्या आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.पी–५३/पीडब्ल्यु–५</u>** देण्यात आला. तपासादरम्यान मी साक्षीदारांचे बयान नोंदविले होते. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला जाऊन मुद्देमाल पावती तयार केली होती. तपासादरम्यान जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. तपास पूर्ण झाल्यानंतर मी आरोपी विरुध्द दोषारोपत्र दाखल केले. तपासादरम्यान मला असे आढळले होते की, आरोपींनी तक्रारदार याला मारहाण करुन दुखापत पोहोचवली होती. आज आरोपी न्यायालयात हजर आहेत किंवा नाही हे मी बराच कालवधी गेल्यामुळे ओळखु शकत नाही.

**<u>उलटपास सर्व आरोपींतर्फे श्री.ए.डी.सानप यांच्या तर्फे –</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार व तिचे पती माझ्या ओळखीचे होते. घटनेच्या वेळी एपीआय माने होते. मला केस डायरी तपासाकरिता पोलीस स्टेशन अधिकारी यांनी दिली होती. माझ्याकडे तपास वर्ग करण्यापुर्वी तक्रारदार व तिचे पती ए पी आय माने यांच्या कक्षात

बसले होते किंवा काय याबाबत मला माहित नाही. मला ज्यावेळी तपासाची कागदपत्रे मिळाली ती सायंकाळी ६.०० ते ७.०० ची वेळ होती. ज्या दिवशी माझ्याकडे तपास दिला त्यादिवशी मी दिवसभर पोलीस स्टेशनला होतो. घटनास्थळ ते पोलीस स्टेशनचे अंतर मला सांगता येणार नाही. पंचांना मी लेखी सुचनापत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा करण्याकरिता जातांना पंच माझ्या सोबत नव्हते. तक्रारदार याचे घर घटनास्थळावरुन किती अंतरावर होते हे मला सांगता येणार नाही. मुख्य रस्त्यापासुन घटनास्थळ याचे अंतर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, लोखंडी गज मला तक्रारदार याने आणुन दिला होता. मी ज्यावेळी पंचनामा करण्याकरिता घटनास्थळावर गेलो त्यावेळी तिथे लोक गोळा झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यातील मजकूर मी स्वतःच्या मर्जीप्रमाणे लिहिला होता. मी वैद्यकीय अधिकारी यांना वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता लेखी पत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, वैद्यकीय प्रमाणपत्र हे माझ्याकडे तक्रारदार यानेच आणुन दिले होते. मला बिडकीन पोलीस स्टेशन ते सरकारी दवाखाना यातील अंतर सांगता येणार नाही. मी बिडकीन येथे तीन वर्ष कार्यरत होतो.

३. मी साक्षीदारांचे बयाण त्यांच्या सांगण्यानुसार नोंदविले होते. साक्षीदार क्र. २ शेषराव गोपीचंद राठोड याने त्याचे बयाण देतांना मला ''माझी पत्नी पाणी आणायला गेली असता तिला आरोपी परमराम बांधावरील दगड काढत असतांना दिसला होता'' असे सांगितले नव्हते. त्याने त्याचे बयाणात मला ''त्याची पत्नी बेशुध्द पडली'' ही बाब सांगितली नव्हती. मी तक्रारदार याचे बयाण नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे घटनास्थळावर गेलो नव्हतो, त्याठिकाणी मला गज आढळुन आला नव्हता, मी तो पंचांसमक्ष जप्त केला नव्हता, पंचनामा तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे बयाण त्यांच्या सांगण्यानुसार नोंदविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींविरुध्द कोणताही पुरावा आढळुन आला नसतांना देखील मी त्यांचेविरुध्द खोटे पुरावे गोळा करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी तक्रारदाराला कोणतीही मारहाण केल्याची घटना माझ्या तपासात निष्पन्न झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GANESH VASANTAPPA GANDHE
Date: 2026.02.04 17:16:02 +0530

दिनांक – ०४/०२/२०२६

**(जी. व्ही. गांधे)**

न्यायदंडाधीकारी, प्रथम वर्ग, पैठण.